RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक — कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ९, अंक १] सोमवार, जानेवारी २, २०२३ / पौष १२, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक १**

**प्राधिकृत प्रकाशन**

### जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांजकडून

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्र. उपजिभूक्र. ७/भूसं/मुंउजि/एलएक्यू ८४३/२०२२.—मौजे मालाड, तालुका बोरीवली, जिल्हा मुंबई उपनगर येथील "भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३" अंतर्गत न.भू.क्र. ८२७ अ, भाग स. क्र.२३९ भाग चे भूसंपादन.

ज्याअर्थी, प्रस्तुत भूसंपादन प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाला असून प्रकरणी भूसंपादनाची कार्यवाही करणेकरिता जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक १० ऑक्टोबर २०१८ रोजीचे आदेशान्वये उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.७ यांना प्राधिकृत केले आहे. प्रकरणी कलम ११ ची अधिसूचना दिनांक २५-३१ ऑक्टोबर २०१८ रोजी व कलम १९ (१) ची अधिसूचना दिनांक ११ जानेवारी २०१९ रोजी प्रसिद्ध झाली ;

ज्याअर्थी, विहित मुदतीत निवाडा घोषित करणे शक्य नसल्याची जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांची खात्री झाल्याने व भूमी संपादन अधिनियम, २०१३ चे कलम २५ अन्वये अधिसूचना **महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात** प्रसिद्ध करणेत येऊन निवाडा घोषित करण्याच्या कालावधीत प्रथम १२ महिने नंतर ६ महिने व तद्नंतर पुनश्च ६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच W. P. (L) No. 6042/2020 (W. P. No. 2600/2021), अवमान याचिका (एल) क्र. २८९/२०२२ रिट याचिका क्र. २००५/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ७ जानेवारी २०२२ रोजीच्या आदेशास अनुसरून दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यंत आणि दिनांक ५ मे २०२२ रोजीचे आदेशान्वये तसेच दिनांक २९ जून २०२२ व दिनांक २३ सप्टेंबर २०२२ रोजीचे आदेशान्वये प्रकरणी ३ महिन्यांची पुनश्च मुदतवाढ दिली आहे ;

ज्याअर्थी, उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. ७ यांनी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नुकसान भरपाईची ३०% रक्कम अप्राप्त, मा.उच्च न्यायालयात बृहन्मुंबई महानगरपालिकेने संपादनाखालील जमिनीच्या क्षेत्राबाबत दाखल केलेली Notice of Motion (L) No. 103/2019 याचिका, तसेच हितसंबंधितांनी संपादनाखालील क्षेत्राबाबत नोंदविलेला आक्षेप व मा. उच्च न्यायालयात दाखल केलेली W. P.(L) No.6042/2020 (W. P. No. 2600/2021), अवमान याचिका (एल) क्र. २८९/२०२२, W. P. No. 2005/2014 मध्ये Review Petition (L) No.45 (L)/2019 (38/2021), Notice of Motion (L) No. 103/2019 या अद्याप अनिर्णित आहेत.

ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाने W. P. (L) No. 6042/2020 (W. P. No. 2600/2021), अवमान याचिका (एल) क्र. २८९/२०२२ रिट याचिका क्र. २००५/२०१४ मध्ये दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजीचे आदेशान्वये प्रकरणी ३ महिन्यांची पुनश्च मुदतवाढ दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, अद्यापि मा.उच्च न्यायालयात सदर प्रकरण प्रलंबित असल्याने कलम १९ च्या अधिसूचनेच्या अनुषंगाने उपरोक्त कलम २५ च्या अधिसूचनेद्वारे वाढीव कालावधीत निवाडा घोषित करणेस झालेल्या विलंबास समर्थन करणारी परिस्थिती असून सदर मुदतीत निवाडा घोषित करणे शक्य नसल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २५ अन्वये, मा. उच्च न्यायालयाच्या पुढील आदेशास अधीन राहून खालील प्रकरणातील अंतिम निवाडा पारित करण्यास दिनांक २३ डिसेंबर २०२२ पासून ३ (तीन) महिन्यांची वाढीव मुदत मंजूर करत आहे.

**अनुसूची एक**

**जमिनीचे वर्णन**

**मौजे मालाड, तालुका बोरीवली, जिल्हा मुंबई उपनगर**

| अ.क्र. | न.भू.क्र. | स.क्र. | कलम १९ (१) चे दिनांक२९/०८/२०२० रोजीचे शुद्धीपत्रकानुसार अधिसूचित केलेले क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १ | ८२७ अ | २३९ पै. | १,४२,८२३.८० |

**संपादनाचे प्रयोजन**.—पुनर्वसन व पुनर्स्थापन, २- महानगरपालिका शाळा व विकास नियोजन रस्तेकरिता भूसंपादन.

मुंबई,
दिनांक ३० डिसेंबर २०२२.

**मकरंद देशमुख,**
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.